(Marathi)

1023
9191

1580

26

P

Laxmi Prakash Mela Padyavali 1934 in Marathi, Govt of Bombay. R.no. 2481
31. 3. 38;
1580

पदें—पोवाडे

॥ विद्वान् सर्वत्र पूज्यते ॥

# पुणें अनाथ विद्यार्थी गृह

## नाशिक शाखा

RECEIVED
31 MAR 1935



# स्वदेशी प्रचार–मेळा

# पद्यावली

शके १८५६ ] [ सन १९३४

किंमत १ आणा.

वर्ष १४ वें

मेळयाचे वेळीं ‘ स्वदेशी व्रतपत्रिका ’ भरून द्या.

1580
Mar


स्वदेशी माल घ्याल तर
स्वदेशी उद्योगधंदे वाढतील
लोकांना कामधंदा मिळेल
आपलेच लोक पोटभर खातील
तुमची गरिबी जाईल

NATIONAL ARCHIVES LIBRARY
No. 1580
18.1.72
GOVT. OF INDIA

# पुणें अनाथ विद्यार्थी गृह

## नाशिक ] स्वदेशीप्रचार मेळा [ शाखा

सन १९३४

### १ नमन

(चाल– मंगल करहुं दयाकरी देवी)

वंदन वंद्य चरणकमलातें । शारदापते, सुमतिदेवते, मंगल-
कर हो प्रिय देशातें ।। धृ० ।।

हिंदधुरीण दीनजनहितरत ।
चिर यश देई तयांना देवा ।।१।।

हे जगदीश दास्यतम भयकर ।
पथ क्षणि दावी तयांतुनि सकलां ।।२।।

### २ धावा

( राग–देस. ताल–धुमाळी-केरवा. चाल–अजुनिही ..... )

किति दिन बघशिल दीन स्थिति ही,
आतां! माधवा कधि येशी? बोल मुरारी ।।धृ०।।
करित विडंबन कुलिन स्त्रियांचें, म्लेंच्छ छळीती पाही ।।१।।
तरुण अम्ही करुं स्वधर्मरक्षण, आशिर्वचना देई ।।२।।
जनमनमोहन मुरलीगायन, कां ना भुवनीं गाशी ? ।।३।।
रक्षक तूं जर म्हणविशि अमुचा, धांव कशी ना घेशी?।।४।।

## ३ दुर्दशा

( चाल–कोणि नसे वध वाली )

काय दशा ही झाली । जगण्याला सोय न उरली ।
दोन आणे ते मिळाया । कष्ट भारी भारतीं ।
अन्न पाणी स्वच्छ जागा । नाहि बसण्या मोकळी ॥१॥
रोगराई औषधाला । नाहिं पैसा द्यावया ।
कुजत मरणें पाहवे कां । नीति कोठें राहिली ? ॥२॥
भारताचा शेतकरि हा । त्रस्त झाला संप्रती ।
कर्जरोख्यामाजि बुडला । हाय दैना जाहली ॥३॥
चैन सोडा पुण्य जोडा । घ्या स्वदेशी कापडा ।
निश्चयानें नेम पाळा । दुष्ट वेळा पातली ॥४॥
द्या मजूरा सौख्य शांती । मालकांनो संप्रतीं ।
राष्ट्रकाजीं स्वार्थ सोडा । मदत द्याहो आपुली ॥५॥
स्वस्त करितां माल देशी । फार वाढे मागणी ।
बंद होतां माल परका । सुस्थिती ये चांगली ॥६॥
हाल जाती सर्व विलया । स्वर्ग येतो भूवरी ।
हिंदभूच्या लाडक्यांना । मोद होतो अंतरीं ॥७॥

## ४ भगवें ध्वज

(राग–भैरवी. ताल--धुमाळी.)

राष्ट्रशाहिरा उठ तरी अजुनि । उघडि समाधी अरुण उगवला ।
भगवें ध्वज अजि गेलें हर हर । भगवें ध्वज अजि गेलें ।धृ०॥
शिवरायाचें मराठियांचें । निशाण माझ्या स्वातंत्र्याचें ।
स्फूर्ति उधळुनि गेलें हर हर । भगवें ध्वज अजि गेलें ।
हिन्दभूमिच्या स्वतंत्रतेच्या । थडग्यामध्यें भयाणतेच्या ।
निशाण माझें पुरलें हर हर । भगवें ध्वज अजि गेलें ॥१॥

## ५ निद्रिस्त वीरास

( चाल— पारतंत्र्याची धाड. )

वीरा ! निद्रा तुझी, सोड आतां तरी, पहा पहा तुझ्या भंवताली
झाला गुलाम तूं दिसतें ना ?
विसरलास कां अभिमाना ?
रडे भारत तव दिनवाणा
पारतंत्र्याचा मारा, देशावरी झाला, तरी झोंप तुला कशी आली ?
मायभूमी रडे, सहतें ना ?
कहर हा होत, सहतो ना ?
नेलें निशाण तें सहतें ना ?
पारतंत्र्याची सुरी, बघ बसे उरीं, कशि दशा दशा बघ झाली !
इतिहास वाचला तूं ना ?
शिवराय नांव स्मरतें ना ?
पेशवे वीर स्मरती ना ?
वीरलक्ष्मी तुला काय कथी बोला ? चल ऐक ऐक ती बोली !
चल पहा कडे हे तुटले
चल किल्ले हे बघ फुटले
बघ रक्तसडे हे पडले
दऱ्याखोऱ्यांतुनी, रक्त बिन्दूंतुनी चल ऐक बोल बलशाली !
दिला स्वार्थ त्यांनीं होमून
केला त्याग मंत्र दारूण
विसरले कीर्ति सन्मान
मरणाला मिठी दिली देशासाठीं, भीति नसे तयांना शिवली.

---

(डेक्कन पेपर मिल्स् पुणें, यांच्या स्वदेशी कागदावर छापिलें.)

## ६ स्वदेशी व्रत

(चाल–ही न्याय देवता)

घ्या स्वदेशिचें व्रत भारतियांनो विनती चरणाला ॥धृ॥
सार्वजनिक श्रेष्ठ काका स्मृति तयाची विसरतां कां ।
जो कथी 'स्वदेशीविण नच तरणोपायचि देशाला' ॥१॥
स्वदेशीचा मंत्र दिधला बालतिलकें राष्ट्रभूला ।
कां इतुक्यांतचि तो विसरुनि गेलां तत्त्वनिष्ठ नुरला ॥२॥
स्वदेशीचा मंत्र सोपा आचरा घ्या व्रत न झोंपा ।
या व्रता महात्मा गांधि शिकविती आचरुनी काला ॥३॥
स्वदेशीची लाट येतां लोक घेती किती शपथा ।
कां, पूर भावनेचा ओसरतां कृतीहीन बनलां ॥४॥
विदेशी त्या वस्तु नयनीं किती दिसती सदनिं सदनीं ।
कां विदेशिविण नच गृहसंसारा शोभा ये बोला ॥५॥

---

## ७ अवहेलना

(चालः–स्थिति आतां बघवेना . . . .)

झडकरि झिडकारा, बांधवजन, बंधना ॥धृ०॥
किती काल खिचपत, हिंदु बंधु बैसतां,
जीवन जड झालें, रुचत कशी यातना? ॥१॥
अरी करी अरेरावी, डोईवरी नाचतो,
थैमान घालियलें, जाणिव कुणा नाहिं ना? ॥२॥
शूर वीर मर्द तुम्हीं शिवरायाचे मावळे
कुठें गेलि मर्दुमकी होतसे किति हेळणा ॥३॥

---

## ८ वीर तरुणास

(राग–खमाज. ताल–केरवा; चाल–पहनो देशी देश. . . .)

स्मर तरुणा निज इतिहास खरा
स्वातंत्र्यास्तव करि त्याग जरा ॥धृ०॥

तूं चैन कां उपभोगावी । तुझें ध्येय सौख्यें सेवावीं
कां सुखमृगयेंत युगें जावीं । तव शौर्यदीप कां मालवला ॥१॥

जे झुंजतां लढतां गेले । रणीं प्राण होमुन जे घाले
कां स्मृतिमात्रच तुज ते उरले । कां वीरभव तव पालटला ॥२॥

आधार तूं तव मातेला । कसा वीर स्वार्थ सुखी बनला
कां दिव्य स्मृति विसरूनि गेला । कां स्वाभिमान तव मेलेला ॥३॥

हा देश तूं बघ डोळयांनीं । हीन दीन भारत हा मानी
कां तूं मरणांत समाधानी । चल योग्य समय हा तुज आला ॥४॥

---

## ९ स्वदेशीचा मंत्र

(राग :– भीमपलास. ताल– केरवा. चाल :– प्रभो तुझें रूप)

स्वदेशिचा मंत्र, सकळिकें गावा ।
अंतरीं ठसावा, तोच एक ॥ धृ ॥

पारतंत्र्य घाला, आला भारताला ।
जाणिव कुणाला कैशी नाहीं ॥१॥

हिंद हीन झाला, दीन दशे आला ।
वालि ना तयाला कोणी एक ॥२॥

उत्तेजन द्यावें, स्वदेशितें भावें ।
भारता पहावें सौख्यरूप ॥३॥

युक्ति शक्ति शांति, सारी संघशक्ती ।
वाढवोनि देशा, तोषवावें ॥४॥

## १० व्यापारी मालक

( चाल– पाहुणा घराला आला )

तराजूवाला । व्यापारी मालक बनला
ईस्ट इंडिया कंपनि आली
व्यापाराची सनद मिळविली
वखार पहिली स्थापन केली
सुरत शहराला ॥ १ ॥

व्यापारमिषानें दूर धोरणी
डाव टाकिला राजकारणी
कलागतीवर स्वार्थ साधुनी
पाय रोविला ॥ २ ॥

बनिया वाणी राजा झाला
व्यापारावर तट्टू फूगला
मूळ धन्याला सफाइ खाल्ला
धनी नागवला ॥ ३ ॥

यथिल कच्चा माल नेउन
तयार त्याचा नवा बनवुन
पुन्हां अम्हाला तोच विकून
मारला डल्ला ॥ ४ ॥

उत्तमोत्तम कारागीर
संक्रांत अगोदर त्यांच्यावर
आधि घातला घाव कलेवर
धूर्त हा कोल्हा ॥५॥

नेउनि धंदे पार लयाला
परावलंबी देश बनविला
क्रोडो रुपये दरवर्षाला
ओघ चालविला ॥ ६ ॥

सगळा पैसा गेला गेला
सात समुद्रापार पळाला
त्राण न राहे कर द्यायाला
देश गांजियला ॥ ७॥

आस्ते आस्ते रक्त शोषिलें
मर्द हिन्दुना स्त्रैण बनविलें
भुलथापावर कसें झुलविलें
ओळखा याला ॥ ८ ॥

सर्व देशभर देशी चळवळ
अंतःस्फूर्तीची ही खळबळ
देशी व्रताची लागो तळमळ
परतवा घाला ॥ ९ ॥

---

## ११ विनवणी

(चाल – गझल)

धांव देवा या घडीला । उद्धराया भारताला ॥ धृ. ॥

पंक जो परदास्य घाला, त्यांत मी रुतलों दयाळा ।
घेई मातें सांवरोनी, कींव कां ना ये मनाला ॥ १ ॥

दास्यसरितेमाजि आजि, हाय देवा प्राण जाई ।
दीन दुबळा बाहताहे, ही सुरी जाळी जिवाला ॥ २ ॥

शृंखला परदास्यरूपी, भासते भेसूर पायीं ।
मान माझें गान देवा, कंठ सुकला शीण आला ॥ ३ ॥

हे प्रभो परदास्यफासां, गोविला हा काळ कैसा ।
शोकज्वाला भडकताती, शांतवी मन्मानसाला ॥ ४ ॥

भावना भिनल्या मनासी, अंतरीं स्फुरवी स्वदेशी
धन्यता वाटेल मातें, पाहि मज देवा कृपाळा ॥५॥

---

## १२ प्रतापी प्रतापसिंह (पोवाडा)

(चाल–ज्याची त्रिलोकीं कीर्ति व इतर मिश्र)

ॐ नमो शंभो शिवहर । राणाजि रणवीर । जगीं महशूर ।
'प्रतापी प्रतापसिंह अभिधान । मानी रजपूत राणा यशवान
कुळाचा ठेवला खरा अभिमान ॥

पुण्यश्लोक राजराजेश्वर । सोडनि दरबार । राजमंदीर ।
हिण्डु लागले आज रानोमाळ । दीनवाणे झाले बघा लोकपाळ ।
कशी विपरीत गती करी काळ ॥

स्मरुनिया मेवाड ! मेवाड । चितोड ! चितोड । लागलें वेड ।
" वेड नव्हे स्वतंत्रतेची प्यास " । जीव वाहिला सांगा कवणास ।
मातृभूमीच्या नित्य चरणास ॥

(चाल बदलून) जमवुनी क्षत्रिय वीर । सर्वांस केलं जाहीर ॥
व्हा सहाय मज बरोबर । सोडुनी सर्व घरदार ॥

(चाल बदलून) करा धन्य धन्य मेवाडाला ।
तुम्हावांचून कोण साहाय्याला ।
या अशा घोर समयाला ।
आलि निशा दुष्ट मोंगलाला ।
जाचिती पहा हिन्दूला ।
राज्य अधिकाराच्या बला ।
आला ताठा त्याचे अंगाला ।
चित करा त्याचे गर्वाला ।
बघा जरा माता भगिनीला ।
अनुसरा धर्मशास्त्राला ।
चला चला हळदि घाटाला ।

(चा. बदलून) हैदोस कसा घालावा । शिकवुं या आतां मोंगलाला
जाहली प्रतीज्ञा घोर । आठवोनी शंभो शिवहर ।
त्या हळदि घाटिचा वीर । गाजवी रणीं कल्लोळ ।

(चौक ४था)

त्या हळदि घाटाचें युद्ध । कुणाला नाहीं कुणाची शुद्ध ।
कुरुक्षेत्राचें भारती युद्ध । आणावें ध्यानीं ।
चहुंकडे सेना आटोकाट । शिराया नाहीं जराशी वाट ।
फौजेचा अशापरी हा थाट । दोन पक्षाला ।
रजपुत धन्य लढणार । पाठिवर ढाल कटीं तल्वार ।
होउनी घोड्यावरती स्वार । झुंजती भारी ॥
सरदार शौर्यानें धुंद । अंगिं चिलखत पगडि शिरबंद ।
छातिचे तुटति तटातट बंद । त्वेष संचरला ॥
चालती हळदि घाटांत । ढाल तल्वार बरचिचे हात ।
मरा वा मारा शत्रु एकजात । होच ललकारी ॥
उडविती शिरें गगनांत । छाटले पाय कुणाचे हात ॥
मुखांतुनि चाले रक्ताचा पाट । येत अंधेरी ॥
हर हर ! महादेव घोष । चालला दीन दीन बेहोष ।
गर्जना देति अती आवेश । एकमेकांना ॥
सैन्यांत विजय आनंद । करी तांडव चाले रणरंग ।
जाहला रिपुपक्षाचा भंग । घेत माघारी ॥
सणसणाट सूं बाणांचा । चाले खणखणाट इतर शस्त्रांचा ।
ध्वनि प्रचंड अग्नि अस्त्रांचा । जाइ गगनाला ॥
वाजती भेरि रणशिंग । झडति दुंदुभी वाद्य रणरंग ।
जाहले हयांतच सारे दंग । रंग युद्धाचा ॥
हें असें दृश्य पाहून । वन्य पशु पक्षी जाति पळून ।
बिळांमधि साप गेले दडून । कोण ही भीती ॥
काय वर्णु युद्धप्रसंग । कल्पना शाहीराचि झालि दंग ।
डफ तुणतुणं पावलंय भंग । कुंठली वाणी ॥

( मिळवणी )

केलिं किती युद्धें घनघोर । स्वातंत्र्य रणवीर । भरतभूमिवर ।
" करुनियां स्वतंत्र मेवाडास " । प्रतापी प्रतापसिंह शाबास ।
जाहला वंद्य सर्व जगतास ॥

(निवडक भाग)

## १३ विनाशकाले ( पोवाडा )

( चाल :– भारताचा भव्य इतिहास .. .. )

स्वातंत्र्य मार्ग क्रमितांना । हिंदु लोकांना । कोण यातना ।
भोगुनिही कधीं काय मिळणार ? सारे आकाश फाटले पार ।
तयाला कोण देइ आधार ।।
लुटवून सर्वही सोनें, भुकी राहणें, हाल सोसणें,
अशापरि आला डोइवरि भार । उपासमारीनें झालो बेजार ।
हिंदुजन कसे जगीं जगणार ।।
पैशाची तूट अतोनात, जरी देशांत, तरी चैनींत,
मुळींहि न खंड कधीं पडणार । झाला टीकेचा पुरा भडीमार ।
कुणीहि न आम्हाकडे बघणार ।।
स्वाभिमानी हिंदु जनतेला, साह्य देण्याला, न्याय करण्याला,
पुढारी धीर नाहीं धरणार । सर्व बाजुनि आम्ही मरणार ।
मरुनी नामशेष होणार ।।
फितुरही नादि लागुन, खूष राहुन, अम्हा दडपून,
देशभक्तिचा डंका पिटणार । आज परिणाम नाहि दिसणार ।
दैवाचा खेळ कोण लिहीणार ।।
विपरीत बुद्धि सुचतसे, भूल पडतसे, नाश करितसे,
आज सुविचार कसा सुचणार । अनीतिनें जसे सर्व गिळणार ।
त्याच वाटेनें परत फिरणार ।।

( चाल बदलून ) करभार डोइजड स्पष्ट दिसे नजरेला ।।
परि स्वार्थवृत्तिकुंडांत होम पेटला ।।
आहुती व्हावे लागते हिन्दि जनतेला ।।
सर्वस्व कसें पुरणार भूक शमण्याला ।।
आत्मार्पण करुनी शांत करुं अग्नीला ।।
जरी मार्ग बिकट वाटला । पाहिजे हाच गिरविला
आयरिश बंधुनीं कसा मार्ग काढिला ।।
निजशत्रु सर्व बाजुनीं त्यांनि रोखिला ।।

लावुं स्वाभिमान ज्योतिला ।
धरु स्वदेशीच्या शस्त्राला ।
शांतिच्या स्मरु मंत्राला ।
(चा० पहिली)कर्मण्येवाधिकारस्ते,गीता शिकविते, मार्ग दाविते,
अनुसरूं चला करूं निर्धार । दास्यतमदूर निघुनी जाणार,
जयश्री स्वदेशीनें मिळणार ॥

---

## १४ ऐक्यभाव ( पोवाडा )

(चाल– शिवरायाचा सिंह.....)

उठा बंधुंनो स्वातंत्र्याची आली ही पर्वणी
चला या क्षणीं लढाया रणीं ॥ धृ० ॥
हिन्द देविचे सैनिक सगळे जमले जयशाली,
रणाची भेरी दुमदुमली ॥
स्वतंत्रतेच्या करूं संगरा आपण एकीनें;
लढूं या रणीं उभारीनें ॥
या ऐक्यमंत्र घोषाचा नादतां रणीं जयनाद ॥
ओरडे कुणी तो तेव्हां "थांबवा पुरे हा वाद ॥
अस्पृश्य तयांना हांका घालवा घुमे हा नाद" ॥
आणि मधें ये हिन्ददेविची गंभिर मृदुवाणी,
चला या क्षणीं लढाया रणीं ॥ १ ॥
" हिन्दभूमिचे वीरपुत्र तुम्हि आलां लढण्याला,
कशाला करितां वादाला ।
बंधुबंधुनो तुम्ही झुंजतां उगीच कां वचनें,
लढाई लढाच एकीनें ॥
हा कोण स्पृश्य हिंदू कीं ओरडे रणीं या कालीं ॥
अस्पृश्य तयांना ठेवा बाजूला वा भंवताली ॥
मिसळणें सहन होतें ना अस्पृश्य जात ती सारी ॥

स्वातंत्र्याच्या संगरकालीं भांडुं नका कोणी,
चला या झणीं लढाया रणीं ।।२।।
स्पृश्य हिंदुंनो अस्पृश्यांनो खरी संधि आली
कराना एकी या कालीं ।।
स्पृश्य हिंदु वा अस्पृश्यहि वा दर्शन अधिकारी,
मंदिरें स्वतंत्रतेचीं खुलीं ।।
हीं पुरे भांडणें आतां राष्ट्राच्या संकटकालीं ।।
हातांत हात घालाया व्हा तयार सगळे वेळीं ।।
बंधु तेज समता यावी मिसळून अशा या काळीं ।।
हरहर गर्जुन एक दिलानें या या समरांगणीं,
चला या झणीं लढाया रणीं ।।३।।
मतभेदानें कितीक कार्यें आपुलीं अडलेलीं
तयांना होइ कोण वाली ।।
सुविचारानें ऐक्य कराना लढण्या नेकीनें
कशाला मतभेदाचें जिणें ? ।।
परदेशी व्यापाराला हटवाना एक दिलानें ।।
बहुनाशकारि व्यसनांना घालवा चला जोमानें ।।
या शिक्षणकार्यासाठीं यत्न करा सद्भावानें ।।
वितंडवादा मूठमाति द्या दृढनिश्चय करुनी,
चला या झणीं लढाया रणीं " ।।४।।
हिन्द देविचे मधुर शब्द हे विरतां भवतालीं,।।
तयांचीं हृदयें थरथरलीं ।।
प्रेमभरानें एक दिलानें वरिलें शपथेला,
तयांनीं स्मरून देशाला ।।
हे एक जहालों आम्ही करणार आज कल्पांत ।।
स्वातंत्र्यप्राप्तिच्यासाठीं करणार आज प्राणांत ।।
एकेक आहुती घेतां होईल चंडिका शांत ।।
आणि अखेरी जिंकुनि आणूं स्वतंत्रता मानी,
चला या झणीं लढाया रणीं ।।५।।

## १५ अभागी

(गझल. ताल–केरवा)

अभागी जन्मला कोणी । असे कां या जगीं प्राणी ।
जयाला पारतंत्र्याचीं । रुचावीं गावया गाणीं ।। धृ० ।।

पराधीना सुखा भासा । गुंतला जो गळा मासा ।
टाकितां अंतिच्या श्वासा । गळातें तो न वाखाणी ।
मरे म्हणतां पाणि पाणी ।।१।।

सिंह अडके फसुनि फांसे । झटे सुटण्या अट्टहासें ।
पारध्याची वाग्विलासें । स्तुती ना करी दीनवाणी ।
गर्जनें त्या कंप आणी ।।२।।

पिंजऱ्याच्या रम्यतेनें । विहग कंठा फुटति गानें ।
दृष्टि त्याची बकध्यानें । द्वार उघडे कधीं पहाणी ।
करित राहे ती शहाणी ।।३ ।।

दास्यगानीं दंग झाला । जीव जन्मा कुणि न आला ।
अहह! विसरें मानवाला । पारतंत्र्यस्तवनखाणीं ।
नका त्याची बरळ वाणी? ।।४।।

---

## १६ भैरवी

(राग–भैरवी; ताल–तीनताल; चाल–हरी भजनको मान रे. )

चरणिं शरण आधार रे । अभय निधान तूं ।।धृ०।।
चरणकमल परम विमल ईशा ।
करित तुझे, उद्धार रे ।।१।।
चरण तुझे करितिल ही आशा ।
हा हलका अरिभार रे ।।२।।
देइ तुझ्या प्रियकर या देशा ।
अभय तुझा वर तार रे ।।३।।

# गेल्या आठ वर्षांतील
# संस्थेचा नाशिक येथील व्याप

**वसतिगृह**—आजची विद्यार्थी संख्या ८७.

**महाराष्ट्र विद्यालय**—अमेरिका-यूरोप इ. ठिकाणचे निरीक्षण करून आलेले पदवीधर शिक्षणतज्ज्ञांचे देखरेखीखालीं स्वतंत्र हायस्कूल. नाशिक येथें पहिले ४ वर्ग.

**महाराष्ट्र मोफत वाचनालय**—मराठी-हिंदी-गुजराथी वृत्तपत्रें, परदेशी मासिकें इ०

**पंखाकारखाना**—जपानी पद्धतीचे कागदी, कापडी पंखे.

**उद्योगमंदिर**—शिवणकाम-साबण व इतर नित्योपयोगी कामांचें शिक्षण.

**महाराष्ट्र क्षयरोग सानाटोरिअम**:—पंचवटीपासून २ मैलांवर हवेशीर १०० एकर जागेंत क्षयरोग्यांसाठीं स्वतंत्र व्यवस्था. पंचवटींत एक्स रे, न्युमोथोरेक्स इ० अधुनिक सामुग्रीसह दवाखाना. युरोपांतून शिकून आलेल्या पदवीधर डॉक्टरांची देखरेख.

**रुग्णसाहित्य संग्रह**:—रुग्ण सुश्रुषेचें सामान, समाजास मोफत वापरण्यास देण्याची सोय.

संस्थेचें स्वतःचे जागेंत स्थलांतर होऊन अवघें १॥ वर्ष झालें. या मुदतींत इमारतीचीं व वाढीचीं अनेक कामें चालू आहेत. विद्यालय इमारत, व्यायामशाळा, उद्योगमंदिर वाचनालय, इ. साठीं स्वतंत्र सोयी व्हावयाच्या आहेत.

आपले मदतीवरच पुढील वाढ अवलंबून आहे.

प्रकाशकः—**वि. गं. केतकर**, व्यवस्थापक पुणें अ. वि. गृह,
मुद्रकः—**शंकर रामचंद्र दाते**, लोकसंग्रह छापखाना, पुणें २

14/3/2010
Rep [illegible]